पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन स्था. १९५०
MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF POONA

बांधकाम विकास विभाग झोन क्र.-६
पुणे महानगरपालिका
जावक क्रमांक झोन ६/७५८४
दिनांक ११/१०/२०२३

## महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 53(1)(a) अन्वये नोटीस

श्री./श्रीमती/ऑक्यूपायर – श्री.संजय दत्तात्रय काकडे
पत्ता – काकडे पॅलेस मंगल कार्यालय , फा.प्लॉट नं.८९,९०,९१ स.नं.२३+२४ + ५५+५७ + ५८/१,
कर्वेनगर पुणे – ४११०५२.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 53(1)(a) पदनिर्देशित अधिकारी यांचे अधिकार आणि कर्तव्ये यांची अंमलबजावणी आणि पालन करण्याचे अधिकार खाली सही करणार यास जा.क्र.मआ/उआ/आस्था/२५७७ दि.०१.०८.२०१६ या आदेशानुसार प्रदान करण्यात आलेले आहेत.

ज्याअर्थी असे निर्देशनास आले आहे की, तुम्ही खालील नमूद केल्याप्रमाणे इमारतीचे/शेडचे बांधकाम अनधिकृतरीत्या पुर्ण केले आहे.

पुणे पेठ काकडे पॅलेस मंगल कार्यालय , फा.प्लॉट नं.८९,९०,९१ स.नं.२३+२४ + ५५+५७ + ५८/१, कर्वेनगर पुणे – ४११०५२ येथे आपल्याकडून विनापरवाना अंदाजे ६७१ चौ.मी. कच्चे /पक्के स्वरूपाचे बांधकाम पुर्ण केलेले आहे.

तपशील :- आपणामार्फत काकडे पॅलेस मंगल कार्यालय दुसरा मजल्यावरील विनापरवाना अंदाजे २५१ चौ.मी. व तीस-या मजल्यावरील संपूर्ण विनापरवाना बांधकाम अंदाजे ४२० चौ.मी. व्यवसायिक वापर चालू आहे.

त्याअर्थी ही नोटीस तुम्हांस प्राप्त झाल्याचे दिनांकापासून ३० दिवस कालावधी मध्ये उपरोक्त जागेवरील वर नमूद केल्याप्रमाणे बेकायदेशीर बांधकाम काढून घ्यावे व मिळकत पूर्ववत करणेत यावी अन्यथा सदरचे बेकायदेशीर बांधकाम पुणे महानगरपालिकेमार्फत जागेवर येवून पाडण्यात येईल व त्या प्रित्यर्थ होणारा खर्च आपणाकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४३९ मधील तरतुदी तुसार वसूल करण्यात येईल.

सदरचे बेकायदेशीर बांधकाम तुमच्याकडून अगर तुमच्या देखरेखी खाली तसेच पुढे चालू ठेवण्यात आले तर वर नमूद करण्यात आलेल्या अधिनियमातील तरतुदीनुसार आम्हांस प्राप्त अधिकारान्वये काम करण्या-या इसमास पोलीस अधिका-याच्या मदतीने घालवले जाईल. व त्या प्रित्यर्थ होणारा खर्च तुमच्या कडून वसूल केला जाईल.

वरील नोटिशीची पूर्तता न केल्यास आपण महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२(१) मधील तरतुदीनुसार फौजदारी खटल्याच्या कारवाईस पात्र ठराल आणि सदरील नोटिशीची पुर्तता न केल्यास पुणे मनपा तर्फे बेकायदेशीर बांधकाम पाडून टाकण्यात येईल व त्यासाठी आलेल्या कोणत्याही खर्चाची रक्कम तुमचे कडून वसूल करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी,

( सागर शिंदे )
पदनिर्देशित अधिकारी तथा
कनिष्ठ अभियंता/ शाखा अभियंता
बांधकाम विकास विभाग झोन क्र ६
पुणे महानगरपालिका

(श्रीकांत गायकवाड )
पदनिर्देशित अधिकारी तथा
उप अभियंता
बांधकाम विकास विभाग झोन क्र ६
पुणे महानगरपालिका

Received.
mangesh ... 
axgn14495. 11/10/23

# पंचनामा

आज दिनांक ११/१०/२०२३ रोजी मिळकतीची दोन पंचासमक्ष पाहणी केली. जागेवर मालक / विकसक/भोगवटादार मॅनेजर हजर होते.

मालमत्तेचे / मिळकतीचे वर्णन ( पत्ता ) - काकडे पॅलेस मंगल कार्यालय फा.प्लॉट नं.८९,९०,९१ स.नं.२३+२४ + ५५+५७ + ५८/१, कर्वेनगर पुणे-४११०५२.

मालकाचे / विकसकाचे/ भोगवटादाराचे नांव :- श्री.संजय दत्तात्रय काकडे

लाईट मीटर क्रमांक :-

MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF POONA
पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन
स्था. १९५०
★ EST-1950 ★

चतु:सिमा :-

पुर्व – सार्थक अपार्टमेंट
पश्चिम – अंतर्गत रस्ता
दक्षिण – अंतर्गत रस्ता
उत्तर – मागील इमारत

अनधिकृत बांधकामाचा तपशील अंदाजे -_आपणामार्फत काकडे पॅलेस मंगल कार्यालय दुसरा मजल्यावरील विनापरवाना अंदाजे २५१ चौ.मी. व तीस-या मजल्यावरील संपूर्ण विनापरवाना बांधकाम अंदाजे ४२० चौ.मी. व्यवसायिक वापर चालू आहे.





( सागर शिंदे )
पदनिर्देशित अधिकारी तथा
कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता
बांधकाम विकास विभाग झोन क्र.-६
पुणे महानगरपालिका

सदर पंचनामा आमचे समक्ष केला असे.

सही

पंच १) नांव व पत्ता ---ओमकार काळे---
---(कोथरूड)---

पंच २) नांव व पत्ता --- भामेश घोडके---
---केशवनगर---